आकाशवाणी मुंबई
राष्ट्रीय बातमीपत्र - रात्री ८.०५ वाजता
१५ सप्टेंबर २०२५ - सोमवार

**<u>ठळक बातम्या</u>**

- येत्या १ ऑक्टोबरपासून सर्वसाधारण तिकीट आरक्षण सुरू झाल्यावर सुरुवातीचे १५ मिनिटे केवळ आधार प्रमाणित वापरकर्त्यांनाच तिकीट आरक्षित करता येणार

- वक्फ सुधारणा कायद्याला पूर्ण स्थगिती द्यायला सर्वोच्च न्यायालयाचा नकार/ तीन तरतुदींना दिली तात्पुरती स्थगिती

- नवनियुक्त राज्यपाल आचार्य देवव्रत यांचा शपथविधी

**आणि**

- रशियाच्या मालकीच्या मालमत्ता आणि ठेवींवर टाच आणून युक्रेनला निधी पुरवण्याचा प्रयत्न करणाऱ्या देशांना सडेतोड प्रत्युत्तर देण्याचा रशियाचा इशारा

**<><><><><>**

येत्या १ ऑक्टोबरपासून रेल्वेच्या तिकिटाचं आरक्षण सुरू झाल्यानंतर पहिल्या १५ मिनिटात केवळ आधार प्रमाणित वापरकर्त्यांनाच तिकीट आरक्षण करता येणार आहे. IRCTCची वेबसाइट आणि APP वरच नागरिकांना ही तिकिट आरक्षित करता येतील. सध्या हे निर्बंध केवळ तत्काळ बुकींगसाठी लागू आहेत. आता सर्वसामान्य नागरिकांच्या फायद्यासाठी सर्वसाधारण तिकीटांच्या आरक्षणासाठीही हे निर्बंध लागू होतील.

तिकिट खिडकीवर होणाऱ्या तिकीट आरक्षणाच्या वेळेत मात्र कुठलाही बदल होणार नाही.

**<><><><><>**

सर्वोच्च न्यायालयानं वक्फ सुधारणा कायदा २०२५ ला पूर्णपणे स्थगिती द्यायला नकार दिला असून या कायद्यातल्या काही तरतुदींना स्थगिती दिली आहे. सरन्यायाधीश न्यायमूर्ती भूषण गवई आणि न्यायमूर्ती ए जी मसीह यांच्या

खंडपीठानं हा निर्णय दिला. वक्फ करण्यासाठी देणगीदार किमान पाच वर्षे इस्लाम धर्माचा अनुयायी असावा ही तरतूद न्यायालयानं स्थगित केली आहे. वक्फ मालमत्तेचं सरकारी मालमत्तेवर अतिक्रमण झालं की नाही हे ठरवण्याचा अधिकार शासनानं नेमलेल्या प्रशासकीय अधिकाऱ्यांना बहाल करण्यालाही खंडपीठानं स्थगिती दिली आहे. तसंच वक्फ बोर्डावर मुस्लिमेतर व्यक्तीची नेमणूक करण्याची तरतूद यासंदर्भात राज्य सरकारांनी ठोस नियम करेपर्यंत स्थगित राहील, असं न्यायालयानं स्पष्ट केलं. आज दिलेला निवाडा प्रथमदर्शनी निरीक्षणांवर आधारित असून, खटल्याची सविस्तर सुनावणी नंतर होईल, असंही न्यायालयानं सांगितलं.

**<><><><><><>**

वक्फ दुरुस्ती विधेयकावरच्या सर्वोच्च न्यायालयाच्या निकालाचं केंद्रीय अल्पसंख्याक व्यवहार मंत्री किरेन रिजिजू यांनी स्वागत केलं आहे. सरकारने या विधेयकामागचे तर्क आणि तथ्यं न्यायालयासमोर सादर केले आहेत. त्यामुळे सर्वोच्च न्यायालयाने दिलेला निकाल हा विधेयकामागच्या दृष्टिकोनाचा विजय असल्याचं रिजिजू म्हणाले.

**होल्ड - रिजीजू**

**<><><><><><>**

बिहार, पश्चिम बंगाल आणि आसाम या राज्यांमधून घुसखोरांना बाहेर काढण्यासाठी रालोआ सरकार वचनबद्ध आहे, असं प्रतिपादन प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी आज केलं. बिहारमधल्या पूर्णिया इथं पूर्णिया विमानतळाच्या टर्मिनल इमारतीचं उद्घाटन प्रधानमंत्र्यांच्या हस्ते आज झालं, त्यावेळी ते बोलत होते. राजद आणि काँग्रेसच्या कुशासनामुळे लोकांनी त्यांना सत्तेच्या बाहेर ठेवलं अशी टीका प्रधानमंत्र्यांनी यावेळी केली. जीएसटी सुधारणांचा उल्लेखही त्यांनी केला. नव्या कररचनेमुळे साबण, पेस्ट, किराणा, कपडे अशा दैनंदिन उपयोगाच्या वस्तू स्वस्त झाल्या आहेत, असं त्यांनी सांगितलं. रालोआ सरकार देशातल्या सर्व

कुटुंबांना घर देण्यासाठी प्रयत्न करत असून आतापर्यंत ४ कोटी कुटुंबांना हक्काचं घर मिळालं आहे, असं मोदी यांनी सांगितलं. तत्पूर्वी, प्रधानमंत्र्यांनी ४० हजार कोटी रुपयांपेक्षा जास्त किमतीच्या प्रकल्पांचं उद्घाटन आणि पायाभरणी केली. राष्ट्रीय मखाना बोर्डाचं लोकार्पणही त्यांनी केलं.

**<><><><><><>**

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी आज कोलकाता इथं तीन दिवसीय संयुक्त कमांडर्स परिषदेचं उद्घाटन केलं. या परिषदेत संरक्षण मंत्री राजनाथ सिंह,सुरक्षा सल्लागार अजित डोवाल, संरक्षण सचिव राजेश कुमार सिंह, संरक्षण दल प्रमुख जनरल अनिल चौहान, तसंच लष्कर, हवाई दल आणि नौदल प्रमुख सहभागी झाले होते. यावेळी लष्करी तसंच राजकीय धोरणांवर चर्चा होणार असून ‘सुधारणांचं वर्षः भविष्यासाठी परिवर्तन’ अशी या परिषदेची संकल्पना आहे. सशस्त्र दलांमध्ये सुधारणा, आधुनिकीकरण आणि सुसज्जता हे याचं उद्दिष्ट आहे.

**<><><><><><>**

सीआरपीएफ कोब्रा बटालीयन आणि पोलिसांच्या संयुक्त पथकाला झारखंडमधे हजारीबाग इथं नक्षलवादविरोधी कारवाईत मोठं यश मिळालं आहे, असं केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी समाजमाध्यमावरल्या पोस्टद्वारे सांगितलं. एक कोटी इनाम असलेला जहाल नक्षलवादी सहदेव सोरेन या कारवाईत ठार झाला, तसंच रघुनाथ हेब्राम आणि बिरसेन गंझु हे दोन नक्षलवादीही मारले गेल्याचं गृहमंत्र्यांनी सांगितलं. झारखंडमधल्या बोकारो प्रदेशातून नक्षलवाद समूळ नष्ट झाला आहे, लवकरच संपूर्ण देश नक्षलवादमुक्त होईल असा विश्वास त्यानी व्यक्त केला.

**<><><><><><>**

नवनियुक्त राज्यपाल आचार्य देवव्रत यांनी आज मुंबईच्या राजभवनात राज्यपाल पदाची शपथ घेतली. मुंबई उच्च नायायालयाचे मुख्य न्यायाधीश श्री चंद्रशेखर यांनी

आचार्य देवव्रत यांना पदाची शपथ दिली. आचार्य देवव्रत यांनी संस्कृत भाषेत शपथ घेतली.

**<><><><><><>**

स्वच्छता ही सेवा या अभियानाला परवापासून म्हणजेच १७ सप्टेंबरपासून सुरुवात होणार आहे. हे अभियान यंदा स्वच्छतोत्सव म्हणून साजरा होणार असल्याची माहिती शहर कल्याण मंत्री मनोहर लाल यांनी आज नवी दिल्ली इथं वार्ताहर परिषदेत दिली. या अभियानादरम्यान देशभर मोठ्या प्रमाणावर स्वच्छता मोहिमा आणि श्रमदान होणार असल्यांचीह त्यांनी सांगितलं. २५ सप्टेंबर रोजी पंडित दीनदयाळ उपाध्याय यांच्या जयंतीदिनी देशव्यापी एक दिवस, एकसाथ, एक तास श्रमदान कार्यक्रम राबवणार असल्याचंही त्यांनी नमूद केलं.

**<><><><><><>**

जीएसटी अर्थात वस्तू आणि सेवा कर परिषदेने नुकत्याच जीएसटी कररचनेत सुधारणा केल्या. या सुधारणेमुळे अनेक क्षेत्रांमध्ये तसंच वस्तुंवरची कराची टक्केवारी कमी झाली आहे. यात सगळ्यात जास्त प्रमाण हे १२ टक्क्यावरून ५ टक्के इतक्या कपातीचं आहे. क्रीडा साहित्य, व्यायामासाठीची उपकरणं, हातमोजे, मासेमारीचं साहित्य अशासारख्या वस्तुंवरचा कर १२ टक्क्यावरून ५ टक्के केला आहे. या निर्णयामुळे या वस्तु परवडणाऱ्या किमतीत उपलब्ध होऊ शकतील आणि मैदानी खेळांना प्रोत्साहन मिळणार आहे. तसंच, बांबूच्या फरश्या, लाकडी पिंप अशांसारख्या लाकूड उत्पादनांवरचा करही १२ टक्क्यावरून ५ टक्के इतका करण्यात आला आहे. येत्या २२ तारखेपासून हे नवे दर लागू होतील.

**<><><><><><>**

राज्य सरकारनं राज्यात सेवा पुरवणाऱ्या इलेक्ट्रिक दुचाकी वाहनांचे भाडे-दर जाहीर केले आहेत. या निर्णयानुसार इलेक्ट्रिक दुचाकी टॅक्सी प्रवासाचा पहिला टप्पा दीड किलोमीटरचा राहणार असुन प्राथमिक भाडं १५ रुपये असणार आहे. त्या नंतरच्या किलोमीटर प्रवासासाठी १० रुपये २७ पैसे प्रमाणे भाडे आकारलं जाणार आहे. ही सेवा पुरवण्यासाठी उबेर, रॅपिडो आणि ओला यांची निवड सरकारनं केली आहे. सध्या त्यांना केवळ मुंबई महानगर क्षेत्रात सेवा पुरवता येईल.

**<><><><><><>**

रशियाच्या मालकीच्या मालमत्तेवर आणि ठेवींवर टाच आणून युक्रेनला निधी पुरवठा करण्याचा प्रयत्न करणाऱ्या प्रत्येक युरोपियन देशाला सडेतोड उत्तर देण्याचा इशारा आज रशियानं दिला आहे. युरोपियन आयोग रशियाची मालमत्ता ताब्यात घेऊन युक्रेनला निधी पुरवठा करण्याच्या प्रयत्नात असून या पार्श्वभूमीवर रशियानं कारवाईचा इशारा दिला असल्याचं सूत्रांनी म्हटलं आहे. रशियाची ३०० बिलियन डॉलर इतक्या किमतीची मालमत्ता आणि ठेवी अमेरिकेच्या, इंग्लंडच्या तसाच युरोपिअन राष्ट्रांच्या ताब्यात आहेत. २०२२ मध्ये रशियानं युक्रेनवर हल्ला केल्यानंतर या देशांनी संबंधित मालमत्ता ताब्यात घेतली आहे.

**<><><><><><>**

बीड जिल्ह्यात झालेल्या जोरदार पावसामुळे जिल्ह्यातल्या अनेक नद्यांनी धोक्याची पातळी ओलांडली आहे. अनेक मोठ्या प्रकल्पांचे दरवाजे उघडण्यात आल्यामुळे नद्यांना पूर येऊन अनेक गावांचा संपर्क तुटला आहे. तर सात गावांमध्ये मिळून ५१ जण पुरात अडकले असून त्यांच्या सुटकेसाठी एनडीआरएफ पथकाला पाचारण करण्यात आलं आहे. आष्टी तालुक्यात ५ ते ६ गावं पूर्णपणे पाण्याखाली गेली असून हवाई दलाच्या मदतीने गावांतल्या नागरिकांना सुरक्षित बाहेर काढलं जात आहे. बीड जिल्ह्यामध्ये पावसाची परिस्थिती पाहता जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांनी

उद्या जिल्ह्यातल्या सर्व शाळा आणि महाविद्यालयं तसंच इतर शैक्षणिक संस्थांना सुट्टी जाहीर केली आहे.

**<><><><><><>**

यंदा ऑगस्टमध्ये वय वर्षं १५ आणि त्यावरील पुरुषांमधल्या बेरोजगारीचा दर पाच टक्क्यांपर्यंत कमी झाला आहे. नियमित सर्वेक्षणानुसार ऑगस्टमध्ये ग्रामीण भागातल्या पुरुषांच्या बेरोजगारीचा दर ४ पूर्णांक ५ दशांश टक्क्यापर्यंत कमी झाला आहे. जूनमध्ये एकूण कामगारांमध्ये महिलांमध्ये कामगारांचं प्रमाण ३० टक्के इतकं नोंदवण्यात आलं होतं, ते ऑगस्ट महिन्यात ३२ टक्के इतकं झाल्याचं सांख्यिकी आणि कार्यक्रम अंमलबजावणी मंत्रालयाने म्हटलं आहे.

**//<><><><><><>//**